# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 10/12/2019 (मंगळवार)
# (सकाळ)

---

## खून करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत 20 कि.मी. अंतरावर मौजा डोंगरमौदा शिवार येथे दिनांक 08/12/2019 चे 16.16 वाजता फिर्यादी नामे– .अनिता सतिश बनसोड, वय 35 वर्ष, रा. येरखेडा, पो. चौकी जवळ कामठी यांची आई नामे– श्रीमती लीलाबाई सूर्यभान वासनीक (मृतक) वय 65 वर्ष या घरी न परतल्याने फिर्यादींनी मौजा डोंगरमौदा शिवारात शेतीत जाउन पाहनी केली. दरम्यान त्या ठिकाणी फिर्यादींच्या आईच्या हाडांचा जळालेला चूरा, हिरव्या रंगाचा बांगडयाच्या तूकडा, 15 ते 20 फूट अंतरावर डेक्याचे काळे केस पडलेले होते. तसेच अंदाजे 50 फूट अंतरावर डोक्याची कवटी दिसून आली. बांगडीचा तूकडयावरून ती फिर्यादींची आई असल्याचे फिर्यादीने ओळखले. जळून मरण पावल्याने पोस्टे ला मर्ग क्र 23/2019 कलम 174 जाफौ प्रमाणे दाखल करण्यात आला.सदर मर्गाचे चौकशीमध्ये फिर्यादी साक्षीदार नातेवाईक यांचे बयानावरून आरोपी नामे– राजू रतिराम सोनटक्के, वय 30 वर्ष, रा डेंगरमौदा, ता. कुही रा दहेगाव, ह.मू.धरमनगर कळमना, नागपूर हा निष्पन्न झाल्याने आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 302, 201 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड पोर्णिमा तावरे या करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत चिचोली शिवार येथे दिनांक 09/12/2019 चे 15.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– दिलीप रामचंद्र वैध, वय 43 वर्ष, रा. चिचोली ता. मौदा जि. नागपुर हे आठवडी बाजारात नाश्त्याचे दुकान लावत असुन ते बाजारात गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील दरवाजाचे कूलुप तोडून आत प्रवेश करून घरात ठेवलेले बॅगमधील 60,000/–रू. व सोनपाडीचे प्लास्टीक दोन डब्यामध्ये ठेवलेले चिल्लर 3,000 रियलमी कंपनीचा मोंबाईल फोन कि. 3,000/–रू. व एक सोन्याची अंगठी कि. 6000/–रू. असा एकुण कि. 72,000/– रु चा मुद्देमाल चोरुन नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ठाकुर हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर   जिल्हा (ग्रामीण), नागपूर